खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३–२४

### साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला – मा. आनंद माडगुळकर

लोकमत

# 'गीतरामायण' हा गदिमांच्या आयुष्यातील सुवर्णकळस : माडगूळकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** आधुनिक महाराष्ट्राचे वाल्मिकी असलेल्या ग. दि. माडगूळकरांनी अजरामर अशी काव्यनिर्मिती केली. त्यामध्ये 'गीतरामायण' हा त्यांच्या आयुष्यातील सुवर्णकळस असल्याचे भावोद्गार संगीत कलाकार आनंद माडगूळकर यांनी काढले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित



साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'माझ्या खिडकीतून गदिमा' या विषयावर बोलत होते. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, संचालक डॉ. अनिल खिंवसरा, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, राजेंद्र टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे आणि विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

आनंद माडगूळकर यांनी आपल्या मनोगतात गदिमांच्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले की, गदिमांचे व्यक्तिमत्त्व सर्व विश्व व्यापणाऱ्या आभाळासारखे होते. त्यांचे छायाछत्र आमच्या माथ्यावर सदैव राहिले. आम्ही भावंडेही त्यांच्या सावलीतून बाहेर पडलो नाही. याप्रसंगी त्यांनी गीतरामायण निर्मितीच्या काही गमतीशीर कथा सांगितल्या. गदिमांची उत्स्फूर्तता, कवित्वशैली, अभिनय यांचे किस्से सांगितले.

सुधीर फडके आणि गदिमा यांचे काव्यसुरांचे अद्वैत त्यांनी उलगडून दाखवले. गदिमांची काही भावगीते, लावण्या त्यांनी गाऊन दाखवल्या. शेवटी ते म्हणाले की, महान प्रतिभावंत असलेल्या गदिमांचे पुसटसे जरी चित्र मी विद्यार्थ्यांच्या मनाच्या कोपऱ्यात उभे करू शकलो असेन, तरी स्वतःला धन्य समजेन. डॉ. बी. डी. अनुसे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. व्ही. व्ही. कांबळे यांनी परिचय करून दिला. मयूरी टोके हिने आभार मानले.

Hello Pune Gramin
Page No. 6 Feb 03, 2024
Powered by: erelego.com

केसरी
www.dailykesari.com

पुणे, २ फेब्रुवारी २०२४
@kesarinewspaper
६

# गीतरामायण हा गदिमांच्या आयुष्यातील सुवर्णकळस : आनंद माडगूळकर

**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** आधुनिक महाराष्ट्राचे वाल्मिकी असलेल्या ग. दि. माडगूळकरांनी अजरामर अशी काव्यनिर्मिती केली. त्यामध्ये गीतरामायण हा त्यांच्या आयुष्यातील सुवर्णकळस असल्याचे भावोद्गार संगीत कलाकार आनंद माडगूळकर यांनी काढले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'माझ्या खिडकीतून गदिमा' या विषयावर बोलत होते.



राजगुरूनगर येथे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलताना आनंद माडगूळकर.

या प्रसंगी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, संचालक डॉ. अनिल खिंवसरा, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, राजेंद्र टाकळकर, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एच.एम. जरे, उपप्राचार्य प्रा.व्ही.बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे आणि विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आनंद माडगूळकर यांनी मनोगतात गदिमांच्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, की गदिमांचे व्यक्तिमत्त्व सर्व विश्व व्यापणाऱ्या आभाळासारखे होते. त्यांचे छायाछत्र . आमच्या माथ्यावर सदैव राहिले. आम्ही भावंडेही त्यांच्या सावलीतून बाहेर पडलो नाही. या प्रसंगी त्यांनी गीतरामायण निर्मितीच्या काही गमतीशीर कथा सांगितल्या. गदिमांची उत्स्फूर्तता, कवित्वशैली, अभिनय याचे किस्से सांगितले. सुधीर फडके आणि गदिमा यांचे काव्यसुरांचे अद्वैत त्यांनी उलगडून दाखवले. गदिमांची काही भावगीते, लावण्या त्यांनी गाऊन दाखवल्या. शेवटी ते म्हणाले की, महान प्रतिभावंत असलेल्या गदिमांचे पुसटचे जरी चित्र विद्यार्थ्यांच्या मनाच्या कोपऱ्यात उभे करू शकलो असेल, तरी मी स्वतःला धन्य समजेल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी.डी. अनुसे यांनी, परिचय प्रा. व्ही.व्ही. कांबळे यांनी, तर आभार मयुरी टोके या विद्यार्थिनीने मानले.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
02 Feb 2024 - Page 2

# गीतरामायण हा गदिमांच्या आयुष्यातील सुवर्णकळस - आनंद माडगूळकर

**राजगुरुनगर (दे. आरंभ पर्व)**
आधुनिक महाराष्ट्राचे वाल्मिकी असलेल्या ग.दि. माडगूळकरांनी अजरामर अशी काव्यनिर्मिती केली. त्यामध्ये गीतरामायण हा त्यांच्या आयुष्यातील सुवर्णकळस असल्याचे भावोद्गार संगीत कलाकार आनंद माडगूळकर यांनी काढले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'माझ्या खिडकीतून गदिमा' या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, संचालक डॉ. अनिल खिंवसरा, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, राजेंद्र टाकळकर, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, उपप्राचार्य प्रा.व्ही.बी.दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे आणि विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



• राजगुरुनगर येथे हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलताना संगीत कलाकार आनंद माडगूळकर. (छायाचित्र : किरण खुडे, राजगुरुनगर) •

आनंद माडगूळकर यांनी आपल्या मनोगतात गदिमांच्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, की गदिमांचे व्यक्तिमत्त्व सर्व विश्व व्यापणाऱ्या आभाळसारखे होते. त्यांचे छायाछत्र आमच्या माथ्यावर सदैव राहिले. आम्ही भावंडेही त्यांच्या सावलीतून बाहेर पडलो नाही. या प्रसंगी त्यांनी गीतरामायण निर्मितीच्या काही गमतीशीर कथा सांगितल्या. गदिमांची उत्स्फूर्तता, कवित्वशैली, अभिनय याचे किस्से सांगितले.

सुधीर फडके आणि गदिमा यांचे काव्यसूरांचे अद्वैत त्यांनी उलगडून दाखवले. गदिमांची काही भावगीते, लावण्या त्यांनी गाऊन दाखवल्या. शेवटी ते म्हणाले की महान प्रतिभावंत असलेल्या गदिमांचे पुसटचे जरी चित्र विद्यार्थ्यांच्या मनाच्या कोपऱ्यात उभे करु शकलो असेल, तरी मी स्वतःला धन्य समजेल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी.डी.अनुसे यांनी, परिचय प्रा. व्ही. व्ही.कांबळे यांनी तर आभार मयुरी टोके या विद्यार्थीनीने मानले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभागप्रमुख**